# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २६-०५-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०४) इतिवृत्त**

**शुक्रवार दिनांक २६ मे २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. रेणुकादास (राजू) वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ११.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

०१) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०२) सौ. दलाल लता श्रीनिवास
०३) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
०४) श्री. दिलीप नारायण गायकवाड
०५) श्री. पांडे विनायक प्रभाकर
०६) डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
०७) श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
०८) श्री. दाभाडे हिम्मतराव साळुबा
०९) श्री. मो. जावेद मो. इसाक
१०) श्री. शिरसाट संजय पांडुरंग
११) श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

**श्री. विनायक पांडे :** आजच्या दैनिक सामना या वृत्तपत्रातून बातमी आलेली आहे की, संपूर्ण आरोग्य खाते आजारी आहे. एकही डॉक्टर नाही. श्वानदंश प्रतिबंधक लस कोणत्याही दवाखान्यात ठेवलेली नाही. या संदर्भात खुलासा घेण्यात यावा.

**प्र. आरोग्य वैद्य.अधि.:** श्वानदंश प्रतिबंधक लसीचा पुरवठाधारकाने पुरवठा न केल्याने स्थानिक बाजारातून खरेदी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. एक महिन्याचा साठा खरेदी करण्यात येईल. महानगरपालिकेचे एकूण ३६ वैद्यकीय अधिकारी आहेत, त्यापैकी ३ रजेवर आहेत. त्यापैकी २ वैद्यकीय अधिकारी व एक आरोग्य वैद्यकीय अधिकारी रजेवर आहेत. रजेच्या कालावधीत पर्यायी व्यवस्था केली आहे.

**श्री. मुजीब खान :** पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत आरोग्य अधिकारी गैरहजर होते. आरोग्य अधिकारी दडपणाखाली काम करतात व त्यांचे म्हणणे आहे की, दडपणामुळे आम्ही काम करु शकत नाही. या मोहिमेच्या वेळी चार-पाच वैद्यकीय अधिकारी गैरहजर होते त्याचे काय कारण आहे.

**प्र.आरोग्य वैद्य.अधि. :** पल्स पोलीओच्या कार्यक्रमाच्या अंतर्गत सर्व वैद्यकीय अधिकारी कामावर होते. कुणीही कामावर गैरहजर नव्हते. सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी कर्तव्य बजावलेले आहे.

**श्री. मुजीब खान :** या कामासाठी चार वैद्यकीय अधिकारी नव्हते. सभागृहाची दिशाभूल होत आहे. वैद्यकीय अधिकारी यांना सुटीवर जाण्यासाठी कोण भाग पाडत आहे?

वैद्यकीय अधिकारी यांची जेष्ठता आहे किंवा नाही? कचरा उचलण्याकडे डोळेझाक होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये जेष्ठ कोण आहे?

**मा. सभापती :** वैद्यकीय अधिकारी यांची जेष्ठतेबद्दल सभागृहास माहिती द्यावी.

**श्री. रविकांत गवळी :** घनकचरा व्यवस्थापनाचा अतिरिक्त कार्यभार कुणाकडे आहे?

**उप आयुक्त (प्र) :** सेवाजेष्ठता यादी बाबतची माहिती थोडया वेळात सादर करण्यात येईल. मा. स्थायी समितीच्या निर्देशानुसार घनकचरा कक्ष प्रमुख म्हणून वैद्यकीय अधिकारी जेष्ठतेत अनुक्रमांक दोन वरील वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती टाकळीकर यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. दोन दिवसांपासून त्या रजेवर आहेत.

**श्री. मुजीब खान :** पुर्वी ही कामे यांत्रिकी विभागाकडून चांगल्या प्रकारे करण्यात येत होती. तेंव्हा कचरा दिसत नव्हता. जेव्हापासून आरोग्य विभागाकडे हे काम देण्यात आले तेव्हापासून कचरा साचलेला दिसतो. आता निविदा काढण्यात आलेल्या आहेत. वाईट परिस्थिती आहे. नाल्यावर फवारणी होत नाही. डासांचे प्रमाण वाढलेले आहे. डासांपासून नागरीक त्रस्त आहेत. मकसूद कॉलनी, शहाबाजार, रशीदपूरा, हिनानगर येथील नाले भरलेले आहेत. फावडा पार्टीकडून नाली काढून पाणी जाण्यासाठी प्रवाह सुरळीत करीत होते. परंतु आता मनुष्याच्या जिवाला धोका होत आहे. या सर्व बाबी सहन कराव्या लागतात.

**उप आयुक्त (प्र) :** डॉ. टाकळीकर दोन दिवस सुटीवर होते. त्यांचा अतिरिक्त कार्यभार डॉ. जयश्री कुलकर्णी यांच्याकडे देण्यात आला होता.

**श्री. रविकांत गवळी :** घनकचरा व्यवस्थापन यांत्रिकी विभागाकडे का देत नाही, इतर महानगरपालिकांमध्ये यांत्रिकी विभागाकडे आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** श्वानदंश प्रतिबंधक लस घेण्याबाबतचे काय झाले? स. सदस्य श्री. पांडे यांनी या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. एक ते दीड वर्षापासून श्वानदंश प्रतिबंधक लसीचा पुरवठा बंद झाल्याबद्दल वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडून महानगरपालिकेस पत्र आलेले आहे व किती प्रमाणात श्वानदंश प्रतिबंधक लस घ्यावी लागेल याची माहिती देखील दिलेली आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात ७ लाखाची तरतुद केलेली होती. मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६४ अन्वये कुत्र्यांच्या दंशावर औषधोपचार करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर आहे. वर्षभरात एकही इंजेक्शन दिलेले नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास कळविलेले नाही. भारतात फक्त दोन कंपन्या या लसीचे उत्पादन करतात. ७ लाख रुपये व्यपगत झाले यास जबाबदार कोण? शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी गेले असता ते बाहेरुन लस आणण्यासाठी लिहून देतात. तीन ते पाच इंजेक्शन्स घ्यावे लागतात. गरीब लोकांची खरेदी करण्याची ऐपत नाही. या संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी.

**प्र. आरोग्य वैद्य.अधि. :** नोव्हेंबर २००५ ला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने श्वानदंश प्रतिबंधक लसीचा पुरवठा बंद झाल्याबद्दल कळविलेले आहे. तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी संचिका सुरु केली होती. दिनांक २८ मार्चला १२००, ३१ मार्चला २००० श्वानदंश प्रतिबंधक लसींचा पुरवठा करण्याचे रु. ६,९९,९६७ चे आदेश देण्यात आले होते. सरासरी ८००

लसींची प्रतिमहा आवश्यकता भासते. डॉ. पी. आर. कुलकर्णी यांच्या काळात फाईल सुरु करण्यात आली होती. आतापर्यंत स्थानिक बाजारातून खरेदी केलेली नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** मागच्या सभेच्या वेळेस दोन तीन दिवसांत लसींचा पुरवठा होईल असे सांगण्यात आले होते. त्यावेळेसही मी बोलले होते की सदर लस उपलब्ध होऊ शकणार नाही. वर्षभर काय केले?

**मा. सभापती :** वेळेवर सदर लस उपलब्ध होणार नाही याची आपणांस कल्पना होती.

**प्र. आरोग्य वैद्य. अधि. :** रेट कॉन्ट्रॅक्ट (मंजूर दरसूची) वर दोन्ही लसी उपलब्ध होत्या.

**डॉ. आशा बिनवडे :** तेव्हा लोकल पर्चेस का केले नाही?

**मा. सभापती :** नोव्हेंबर २००५ पासून आतापर्यंत काय कार्यवाही केली?

**प्र. आरोग्य वैद्य. अधि. :** १० मे पर्यंत देण्याचे पुरवठाधारकाने मान्य केले होते. परंतु अद्याप पर्यंत पुरवठा झाली नाही. यापुर्वी कधीच लोकल पर्चेस करण्यात आलेले नाही. आठ दहा वर्षापूर्वी ठेवले होते, त्यावेळेस प्रतिसाद नव्हता. घाटी दवाखान्यात शहराच्या परिसरातील रुग्ण येतात. यापैकी शहरातील किमान ५० टक्के रुग्ण असतील. सुमारे ४०० इंजेक्शन लागतील. लोकल पर्चेस करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** श्वानदंश प्रतिबंधक लस ही जीवरक्षक औषधीमध्ये मोडते.

**मा. सभापती :** श्वानदंश प्रतिबंधक लस ही कोणतेही नियम न दाखवता आपल्या आरोग्य केंद्रात व घाटी दवाखान्यात उपलब्ध होईल याबद्दलची काळजी घेण्यात यावी.

**उप आयुक्त (प्र) :** वैद्यकीय अधिकारी यांची ०१-०१-२००६ ची स्थिती दर्शविणारी जेष्ठतेबाबतची माहिती सभागृहास देण्यात येत आहे. जेष्ठतेत डॉ. जयश्री कुलकर्णी, त्यानंतर डॉ. टाकळकर, त्यानंतर डॉ. गायकवाड अशी १७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची यादी आहे. डॉ. पी. आर. कुलकर्णी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** यांत्रिकी विभागाकडे घनकचरा व्यवस्थापन देण्यात यावे. आपल्या महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागाकडे आहे, इतर महापालिकेत यांत्रिकी विभागाकडे आहे. डॉ. पी.आर. कुलकर्णी किती दिवस रजेवर आहेत? ते जर रुजू होत असतील तर त्यांना त्वरीत रुजू होण्यासाठी सांगण्यात यावे. अन्यथा शासनाकडे नवीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी मागणीसाठी पाठपुरावा करण्यात यावा.

**श्री. जावेद कुरेशी :** वार्ड फ मधील मालमत्ता कर वसुली संदर्भात पैशाच्या अपहारासंबंधी अद्याप खुलासा झालेला नाही.

**सौ. लता दलाल :** महानगरपालिकेमध्ये अनेक घोटाळे झाले. आपण चौकशी समित्या नियुक्त करीत गेलो. यामुळे असे घोटाळे करणाऱ्यांचा धीटपणा वाढत गेला व साहस वाढत गेले. वार्ड फ संदर्भात वृत्तपत्रातही बातम्या आलेल्या आहेत. संबंधीत कर्मचाऱ्यांने खोटया पावत्या छापून अफरातफर केलेली आहे. या संदर्भात काय कारवाई करण्यात आली? संबंधीतास निलंबीत केले का? कालच्या दैनिक सामना या वर्तमानपत्रात बातमी छापून आली की पाच वर्षापुर्वी बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यास पुन्हा कामावर घेण्यात येते. फाईलवर

कुणीतरी लिहितो व पुन्हा घेण्यात येते. यामुळे कर्मचाऱ्यांची हिंमत वाढली. याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली?

**सहा. आयुक्त-१ :** वार्ड कार्यालय फ येथील मालमत्ता कराचा १,६७,११६/- रुपयांचा कमी भरणा केल्या संदर्भात वार्ड अधिकारी यांनी अहवाल दिल्यानंतर संबंधीत लिपीकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. त्यांचेकडून समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्यामुळे त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

**श्री. रविकांत गवळी :** १,६७,११६/- रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा खुलासा केलेला आहे, परंतु वृत्तपत्रात ३ लाख रुपये छापून आले. संबंधीत कर्मचारी रोखपाल म्हणून होते की त्यांचेकडे पावती पुस्तक दिले होते?

**सहा. आयुक्त-१ :** संबंधीत कर्मचारी कनिष्ठ लिपीक म्हणून होते. वार्ड अधिकारी यांचेकडून १,६७,११६/- रुपये कमी भरणा संदर्भात पत्र आले. प्रशासनाने या संदर्भात मुख्य लेखापरिक्षक यांना संपूर्ण लेखा परिक्षण करणेबाबत कळविलेले आहे.

**श्री. रविकांत गवळी :** १ मे ते २० मे पर्यंत काय कार्यवाही केली? फक्त निलंबीत केल्याचे स्पष्ट होते. गुन्हा नोंद केला नाही. नगरसेवक असता तर सरळ गुन्हा नोंदविला असता. मा. आयुक्तांनी ३ लाख रुपये भविष्य निर्वाह निधीतून वसुल करणार असे वृत्तपत्रात आले आहे. खरी आकडेवारी काय आहे, गुन्हा नोंदवला काय?

**श्री. जावेद कुरेशी :** लेखा परिक्षण केले तर सात लाख रुपयांचा गैरव्यवहार उघडकीस येईल. ८० हजाराचे ८ हजार करतात. सहा ते सात लाख चोरीचे प्रकरण आहे, गुन्हा दाखल करण्यात यावा व ज्यांच्या पर्यवेक्षणाखाली हे झाले त्यांचेवरही गुन्हा दाखल करण्यात यावा.

**सौ. लता दलाल :** कोरी पावती पुस्तके महानगरपालिकेचे नव्हते. ही बातमी खरी की खोटी याची शहानिशा केली जाईल. यापुर्वीही पावत्या फाडल्या असाव्यात. या कामात एक व्यक्ति नाही, संपूर्ण साखळी आहे. हे सर्व कोणाच्या पाठींब्याने चालते?

**मा. सभापती :** निलंबनाला वेळ का लागला? गुन्हा दाखल केला का?

**श्री. जावेद कुरेशी :** यांच्या वरचे जे अधिकारी आहेत त्यांनाही जबाबदार धरण्यात यावे.

**सहा. आयुक्त-१ :** दि. ४-४-२००६ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली. या संदर्भात त्यांचा खुलासा एक महिना ४ दिवसानंतर प्राप्त झाला. खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांना निलंबीत करण्यात आले. मा. आयुक्तांनी लेखा परिक्षण विभागाला संपूर्ण लेखा परिक्षण करण्याबाबत पत्र दिलेले आहे.

**मा. सभापती :** संपूर्ण चौकशी करुन जे दोषी असतील त्या सर्वांवर कारवाई करावी.

**सहा.आयुक्त-१ :** श्याम प्रभुजी बावस्कर या कर्मचाऱ्यास सतत गैरहजर असल्यामुळे सन २००१ मध्ये स्थायी समितीची मान्यता घेऊन बडतर्फ करण्यात आले. एप्रिल २००५ ला अर्ज आला की, कामावर घेण्यात यावे. दि. १८-१०-२००५ रोजी रुजू करुन घेतल. चौकशी झाल्यावर सेवेतून काढण्याचे आदेश दिले.

**सौ. लता दलाल :** कुणाचे आदेश होते, कुणी रुजू करुन घेतले?

**श्री. हिम्मतराव दाभाडे :** कोणत्याही बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यास कामावर घेता येत नाही. भ्रष्टाचार झाल्यासारखे वाटते. ज्यांनी कामावर घेतले त्यांना निलंबीत करा.

**सहा.आयुक्त-१ :** अर्ज आल्यावर त्यांना मेडीकल बोर्डाकडे पाठवले.

**श्री. हिम्मतराव दाभाडे :** त्यांना मेडीकल बोर्डाकडे का पाठवले?

**सहा.आयुक्त-१ :** मेडीकल बोर्डाने त्यांना कामावर घेता येत नाही असे कळविले म्हणून त्यांना बडतर्फ करण्यात आले.

**सौ.लता दलाल :** कुणी रुजू करुन घेतले? हा अधिकार कुणी वापरला ? कोणत्या अधिकाऱ्याने मा. आयुक्त, उप आयुक्त यांचा शेरा स्वत:च्या हाताने लिहिला.

**मा.सभापती :** अत्यंत गंभीर बाब आहे. मेडीकल बोर्डाकडे पाठविणे, खाडाखोड करणे, उप आयुक्त (प्र) यांनी या प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन या संबंधीची माहिती पुढील सभेत अहवालाच्या स्वरुपात देण्यात यावी.

**श्री. मुजीब खान :** प्रभाग क चे मागणी रजिस्टर फाडले. अपहार केला. स्थायी समिती सभेमध्ये सदर रजिस्टरचे पाने फाडलेले असल्याचे दाखवण्यात आले होते. जी पाने फाटलेली आहेत ती पण दाखवण्यात आली होती. सदर प्रकरणात कोण दोषी आहे?

**मा. सभापती :** श्री. श्याम बावसकर व या प्रकरणाचा सविस्तर खुलासा पुढील बैठकीत करावा.

**सौ. लता दलाल :** अशी आणखी काही प्रकरणे असतील तर त्याचाही खुलासा व्हावा.

**श्री.मुजीब खान :** पावती पुस्तकाच्या दुसऱ्या प्रतीवर ८० हजाराऐवजी ८ हजाराची नोंद घेण्यात येते. अशी किती पुस्तके आहेत? एक ठिकाणी बसून वसुली करण्यात येते. मा.आयुक्तांना हे दाखवून दिलेले आहे. मा. आयुक्त चौकशी करणार होते.

**सौ. लता दलाल :** प्रशासनाकडून काही गोष्टी चांगल्या होतात, परंतु काही ठिकाणी अपेक्षांना तडा जातो. मजुरांकडून वसुलीचे काम घेणे कितपत योग्य आहे? यासाठी स्वतंत्र पथक केलेले आहे का? मालमत्ता कर जमा करुन घेण्यात येत नाही. स्पेक मार्फत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. नागरीकांना अनेकवेळी हेलपाटे मारावे लागतात. प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये स्थायी समितीचे एक सदस्य सुनावणीचे वेळी असावे. अनेकांना वारेमाप आणि बहुतांशी लोकांना केलेले मुल्यांकन बदलन नाही. असे असूनसुध्दा लोक कर भरतात. लोक आम्हाला बोलतात.

**श्री. जावेद कुरेशी :** काही पदावर अपात्र कर्मचाऱ्यांची वर्णी लावण्यात येते. ज्यांची पात्रता आहे त्यांची व्यवस्थापनात योग्य दखल घेतली जात नाही. जे पात्रताधारक नाही त्यांना अशा जागेवरुन हटविण्यात यावे.

**मा.आयुक्त :** नळ जोडणी अधिकृत की अनधिकृत हे तपासण्यात येत आहे. अधिकृत असेल तर थकबाकी वसूल केली जाते व अनाधिकृत असेल तर त्यांना नोटीसा देण्यात येतात. अनधिकृत नळधारकांकडून सुरुवात केलेली आहे. स्पेकने नोटीसा दिलेल्या प्रकरणात सुनावणीचे काम संपवायचे आहे.

**सौ.लता दलाल :** मागची व आताची वसुली काय, याबद्दलचे नियोजन काय आहे. स्पेकवर निर्भर राहू नये. स्पेकला सहा महिन्यांची मुदत दिली होती. आज दोन वर्षे लोटली आहेत. ज्या मिळकतीमध्ये काहीच बदल नाही त्यांना जास्त मालमत्ता कर आकारणी करण्यात आली. स्पेकवर विसंबून राहू नये. अनधिकृत नळ कनेक्शनच्या संदर्भात निव्वळ गरीब लोकांना टार्गेट न करता मोठमोठया लोकांकडे वळावे. ज्यांनी २ इंच ऐवजी ४ इंच व्यासाची जोडणी केली त्यांच्यावर कारवाई होत नाही.

**श्री.त्रिंबक तुपे :** स्पेकच्या संदर्भात मा. आयुक्तांना ५-६ महिन्यापुर्वी पत्र दिले होते. त्यांची मालमत्ता कर आकारणीची प्रक्रीया चुकीची आहे. त्यांनी आकारणी केलेल्या

मालमत्ता कराची १० टक्के तपासणी प्रशासनातर्फे करण्यात येणार होती. या संदर्भातील माहिती स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेला देण्यात येणार होती. स्पेकने मालमत्ता कराची जास्त आकारणी केली. गुंठेवारी अंतर्गत त्यांनी लावलेला टॅक्स, गुंठेवारीचा टॅक्स, अकृषि शेतसारा असे अनेक कर आकारण्यात येतात. अनेक लोकांना त्यांनी घरे विकली तरी कर भरणे शक्य नाही. प्रभागनिहाय मालमत्ता करासंदर्भात आलेल्या तक्रारींची सुनावणी होत आहे. काहींना जुने मालमत्ता कर लावून देण्यात येतात. किती प्रकरणात सुनावणी झाली, किती प्रकरणात मालमत्ता कर कमी- जास्त करण्यात आले? अशा कामांमध्ये परस्पर स्पेकशी संपर्क साधून व्यवहार करण्यात येत आहे व परस्पर मालमत्ता कर कमी करुन घेतात. कमी केलेला मालमत्ता कर बरोबर आहे किंवा नाही हे समिती नियुक्त करुन तपासणी करण्यात यावी.

**श्री. रविकांत गवळी :** सिडकोचा भाग ३१ मार्च पर्यंत सिडकोकडे होता व १ एप्रिल पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेला आहे. स्पेक कडून एन-१३ डी सेक्टर सिडको येथील १६ बाय १६ आकाराच्या मालमत्तेस काही ठिकाणी ५००, काही ठिकाणी ५००० तर काही ठिकाणी ९००० असा कर आकारण्यात आलेला आहे.

**मा.सभापती :** स्पेक इंडिया लि. कंपनीकडून मालमत्ता कर आकारणी कमी करण्याच्या संदर्भात सुनावणी घेण्यात येत आहे. या संदर्भातील सविस्तर माहिती पुढील स्थायी समितीमध्ये देण्यात यावी. वसुली तीन टप्प्यांमध्ये करण्यात यावी, म्हणजे वर्षाच्या शेवटी वसुलीचा ताण कमी होईल.

**श्री. हिंमतराव दाभाडे :** प्रभाग क्रमांक ९४ व ९८ या वॉर्डामध्ये दररोज पाणी पुरवठा केला जातो. इतर भागात मात्र एक दिवसाआड पाणी दिले जाते.

**श्री. रविकांत गवळी :** सहा महिन्यापुर्वी दैनिक सकाळमध्ये भूखंडाचे अदालाबदल संदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती. याबद्दल तीन सदस्यीय समिती नेमली होती त्याचा अहवाल अद्याप नाही. याबद्दल दोन पत्र देण्यात आले होते. सदर प्रकरणात अधिकारी दोषी असल्याचे स्पष्ट होते. समितीमध्ये मुख्य लेखाधिकारी, सहा.संचालक नगररचना यांचा समावेश होता व आता मुख्य लेखा परिक्षक, उप आयुक्त (महसूल) हे या समितीमध्ये आहेत.

**मा. आयुक्त :** पुढील सभेच्या नंतर होणाऱ्या सभेत अहवाल देण्यात येईल.

**कार्य.अभि.(पापु) :** एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न करत आहोत.

**श्री. संजय शिरसाट :** २८ कोटीच्या ठेवी बँकेत खाते उघडून कोणाच्या परवानगीने ठेवण्यात आल्या. स्थायी समितीची मान्यता घेतली आहे का?

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत. सुटीही घेतलेली नाही. यापुढे विना परवानगी गैरहजर राहता कामा नये.

**श्री. संजय शिरसाट :** विजया बँकेत खाते उघडण्यात आले. ३१ मार्च रोजी बँकेचा व्याजाचा दर काय होता? कोणत्या बँकेत ठेवी ठेवण्यात आल्या? पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**श्री. हिंमतराव दाभाडे :** वॉर्ड क्र. ९० मुथीयान कॉर्नर येथे महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झाल्याबद्दल प्रशासनाला कल्पना दिली होती. सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्यात यावे. श्री. माधवराव घोरपडे यांना ३.२९ लाख रुपये मोबदला दिला व जागेचे फायदेही घेतले. त्यांनी महानगरपालिकेचे कुंपण भिंतीतील गेट तोडून अतिक्रमण केलेले आहे.

**प्रशासकीय अधि.** : मुथीयान कॉर्नर येथील खुल्या जागेमध्ये श्री. घोरपडे अनधिकृत बांधकाम करीत असल्याच्या बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या. मी स्वत: जायमोक्यावर भेट दिली. श्री. घोरपडे यांना या संदर्भात विचारणा केली, त्यांनी मला नगर रचना विभागाकडून मिळालेली परवानगी व नकाशाची प्रत दाखवली. नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी दिली होती. नंतर काही दिवसांनी सदर बांधकाम परवानगी नगर रचना विभागाने रद्द केली व कामास स्थगिती दिली. माझा व इमारत निरीक्षक यांचा या भागात दररोज राऊंड असतो.

**श्री. हिंमतराव दाभाडे :** नगर रचना विभागाने पत्र दिले की, परवानगी दिली नाही.

**उप अभि.(नगर रचना) :** ८० फुट रुंद विकास योजना रस्त्यामध्ये श्री. घोरपडे यांची जागा बाधीत होती. खुल्या जागेत त्यांना जागा प्रदान करण्यात आली. स्थायी समितीची मंजुरी घेवून बांधकाम परवानगी देण्यात आली. विधी सल्लागार यांनी पत्र दिले की, काम थांबवावे म्हणून मा. न्यायालयाचे निर्देश आहेत. त्या आधारे स्थगिती देण्यात आली.

**श्री.हिंमतराव दाभाडे :** १९८३ मध्ये संबंधितांना ३.८३ लक्ष मोबदला देण्यात आला, तो कशाचा मोबदला देण्यात आला? त्यांना दिलेला धनादेश बँकेमध्ये वटलेला आहे. त्याचा पुरावा पण आहे.

**श्री. संजय शिरसाट :** कुणीतरी व्यक्ति कोर्टातून स्थगिती आणते व विधी सल्लागार हे लेखी कळवतात म्हणून स्थगिती देण्यात येते. या जागेचा नगर भूमापन क्रमांक काय आहे व मा. न्यायालयाने स्थगिती दिलेल्या मिळकतीचा न.भू.क्रमांक काय आहे?

**प्र.सहा.सं.न.र.:** श्री. घोरपडे यांना खुल्या जागेपैकी भूखंड स्थायी समितीच्या परवानगीने प्रदान करण्यात आला. जी जागा प्रदान करण्यात आली त्या जागेवर बांधकाम परवानगी देण्यात आली. प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने व स्थगिती मिळाल्याने बांधकाम परवानगी स्थगित करण्यात आली. मा.न्यायालयात जे प्रकरण चालू आहे त्या प्रकरणातील मिळकतीचा न.भू.क्रमांक व हे प्रकरण दोन्ही वेगळे असल्यामुळे विधी विभागाला अभिप्रायासाठी पाठवले. सदर प्रकरणात अहवाल मिळाला आहे की, दोन्ही मिळकतीचे न.भू.क्रमांक वेगळे आहेत, बांधकाम परवानगी देवू शकतो. कार्यवाही चालू आहे.

**सौ लता दलाल :** ३.८३ लक्ष मोबदला देण्यात आलेला आहे का?

**प्र.सहा.सं.न.र. :** या संबंधीची माहिती घेण्यात येईल.

**मा.सभापती :** गंभीर बाब आहे. विधी विभागाने व नगर रचना विभागाने मोबदल्याच्या संदर्भात सविस्तर खुलासा पुढील बैठकीत करावा.

**श्री. हिंमतराव दाभाडे :** श्री. माधवराव घोरपडे यांचे दोन बिल्डींग व हॉटेल चालू आहे. बिल्डरने इमारत बांधून नवीन बांधकाम केले. हे बांधकाम महानगरपालिकेच्या कुंपण भिंतीवर बांधले. जोपर्यंत प्रकरणात अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत काम करु नये.

**मा.आयुक्त :** तेथे काम होणार नाही हे प्रशासकीय अधिकारी पाहतील. तसेच सदर जागेचा मोबदला देण्यात आलेला आहे काय आणि ज्या जागेवर बांधकाम होत आहे त्या जागेवर बांधकाम चालू आहे किंवा कसे हे सहाय्यक संचालक नगर रचना पाहतील.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिका कार्यालयालगत नाला आहे. सदर नाल्याची मालकी मनपाची किंवा शासनाची आहे. यापुर्वी या ठिकाणी अतिक्रमण नव्हते. वज्द

मेमोरीयल ट्रस्ट यांना जागा दिली. तेथे अतिक्रमण होते त्यावेळेस महानगरपालिकेचे लक्ष नव्हते का? की, कुठल्या अधिकाऱ्यांना माहिती देऊन काम होत होते का?

**प्रशासकीय अधि.**: सध्या कुठलीही माहिती उपलब्ध नाही.

**सौ. लता दलाल :** ऐकून वाईट वाटते. कुतूहलाने बघावे. चौकशी करावी असे वाटत नाही का? काही प्रश्नांची निश्चित अधिकाऱ्यांना माहिती असावी. केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**मा.आयुक्त :** अनधिकृत बांधकाम आहे. कार्यालयाच्या बाजुलाच सहाय्यक संचालक नगर रचना व इतर अधिकाऱ्यांना दिसत असेल.

**सौ.लता दलाल :** ज्या वेळेस भरती टाकण्यात येत होती व रोलर चालू होते त्यावेळी तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांना कल्पना दिली होती. काय कारवाई झ ाली आहे?

**मा.आयुक्त :** पूर्ण संचिका काढावी व अभ्यास करावा. अनधिकृत बांधकाम आहे का ते तपासावे.

**श्री.मुजीब खान :** या प्रकरणात मा.न्यायालयाकडून निर्णय झालेला आहे. वक्फ बोर्डाची जमीन आहे, प्रकरणाचा निर्णय त्यांच्या बाजुने लागलेला आहे. हे पाहून कारवाई करावी.

**मा.सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी पूर्ण संचिका तपासून योग्य ती कारवाई करावी.

**श्री.हिंमतराव दाभाडे :** अतिक्रमण हटाव मोहीम अंतर्गत मी दोन तीन वेळेस सूचना दिली की, माजी महापौर श्री. प्रकाश निकाळजे यांना १५० फुट बाय २०० फुट आकाराची जागा दुध डेअरीच्या वापरासाठी दिलेली आहे. शेडसाठी दिलेली नाही. टपऱ्यांचे भाडे घेतात. स.सदस्य श्री. के.व्ही. मोरे यांनी पत्र दिलेले आहे. रेल्वेस्टेशन रोडवरील पानटपरी हटवावी. ते हटवण्यात आले आहे का? एकनाथनगर एसएसईबी डीपी जवळील अतिक्रमण काढावे.

**मा.सभापती :** वारंवार स.सदस्य सूचना करतात. ज्या गोष्टी बरोबर आहेत त्यावर आपण स्वत:हून कारवाई करणे अपेक्षीत आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** शहरातील प्रमुख चौकांमध्ये विविध प्रकारचे डिजीटल बोर्ड लावण्यात येतात.

**मा.सभापती :** विना परवानगी लावण्यात आलेले सर्व डिजीटल बोर्ड त्वरीत काढण्यात यावेत.

**श्री.मिलींद दाभाडे :** माझ्या वॉर्डामध्ये दवाखान्याच्या इमारती बांधून तयार आहेत पण ते रिकामे आहेत. कर्मचारी नाही म्हणून दवाखाने सुरु होत नाही. कर्मचारी नाहीत तर इमारती का बांधल्या?

**श्री. त्रिंबक तुपे :** शहरातील काही दवाखांन्यासाठी महानगरपालिकेने काही इमारती भाडयाने घेतल्या आहेत का, पुढच्या सभेत खुलासा करण्यात यावा.

**विषय क्र. १८ :**

दिनांक १०-०५-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (का.प.क्र.०३) कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १०-०५-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. : १९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **रंगीन गेट** या ऐतिहासिक दवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. संतोष मोटेगांवकर | २८% जास्त दराने |
| २) | मे. ए.आर.कन्स्ट्रक्शन | ३० % जास्त दराने |
| ३) | श्री.शेख मसुद | ३२ % जास्त दराने |
| ४) | मे.शहा कन्स्ट्रक्शन | ३६ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. संतोष मोटेगांवकर यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे २५% जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम अशा कामाचा नमुना (Sample) वर्क 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ७,६१,०८४/- एवढी असून निविदा २५% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ९,५१,३५५/- होणार आहे.

अशा प्रकाराचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर यापुर्वी विचारार्थ सादर केला होता. परंतु मा.स्थायी समिती सभा दि. २६-०४-२००६ विषय क्र. ६ मध्ये मा.स्थायी समितीने सदर सर्व दरवाजांची एकत्रीत अल्प मुदतीची निविदा काढणे बाबत आदेश दिलेले आहेत. परंतु सदर पाच कामे हे वेगवेगळया ठिकाणचे असल्यामुळे ती एकत्रित केल्यास कामास व सर्व कामे एकाच निविदा धारकास दिल्यास कामास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कामाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ पुन्हा सादर.

**संवाद :**

**श्री. विनायक पांडे :** रंगीन गेटची निविदा अं.प.दरापेक्षा २८ टक्के जास्त दराची श्री. मोटेगांवकर यांची आहे. त्यामध्ये अनुभवी व कुशल कारागीराचा उल्लेख केलेला आहे. दुसरीकडे नौबत दरवाजाची निविदा ४५.४६ टक्के अं.प. दरापेक्षा जास्त दराची आहे. स्पर्धा झालेली आहे का?

**मा.सभापती :** जास्त दराची निविदा संदर्भात खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** महानगरपालिकेकडे ऐतिहासिक दरवाजांचे जतन, संरक्षण करणेची जबाबदारी आहे. महानगरपालिकेने पाच दरवाजांचे काम करुन घेण्यासाठी इंटेक कंपनीकडून अंदाजपत्रक तयार करुन घेतले. काम करुन घेताना अशी कामे नियमित मजुराऐवजी विशिष्ट मजूर, मिस्त्री व चांगले अनुभवी कारागीरांकडून करुन घ्यावे लागतात.

**मा.सभापती :** त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार केले नाही का ?

**अति.शहर अभियंता :** अंदाजपत्रक त्याचप्रमाणे केलेले आहे. बांधकाम सामुग्रीचा प्रकार थोडा वेगळा असतो. विशेषतः सिमेंटऐवजी चुन्याचा वापर करावा लागतो. चुन्याचे मिश्रण तयार करण्यासाठी सर्वसाधारणपणे विशिष्ट प्रकारची यंत्रसामुग्री उपलब्ध होत नाही ती विकत घेवूनच काम करावे लागते.

**श्री. त्रिंबक तुपे :** शहा कन्स्ट्रक्शन यांना ४५ टक्के जास्त दर प्रस्तावित आहे.

**अति.शहर अभियंता :** नौबत दरवाजाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. काम अत्यंत अवघड आहे. यासाठी स्कॅफोल्डींग वेगळी लाकडाऐवजी स्टीलची वापरावी लागते.

**सौ.लता दलाल :** या निविदावरुन असे दिसते की, एका एका ठेकेदाराने एक-एक काम वाटून घेतलेले आहे. यामध्ये रिंग झालेली दिसते. पाच ठेकेदार आहेत. प्रत्येकाला एक-एक काम मिळणार आहे. या कामांमध्ये रिंग थांबवण्यात आल्याचे दिसत नाही.

**श्री.विनायक पांडे :** माझ्या प्रभागात ऐतिहासिक वास्तू, बिबीच्या मकबऱ्याचे काम चालू आहे. काम कशा पध्दतीने करण्यात येते याची माहिती घेण्यात यावी. सदर प्रस्ताव स्थगित किंवा रद्द करावे.

**श्री.संजय शिरसाट :** निविदेवर चर्चा होत आहे. ना हरकत प्रमाणपत्राची गरज असल्याबाबत वर्तमानपत्रात बातम्या आल्या. मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी काम करणार आहे. उघड उघड प्रत्येकाने एक-एक निविदा घेवून ऐतिहासिक दरवाजांचे काम करणार. स्थायी समितीला १० लाखाच्या वरील रक्कमेच्या निविदा मंजुरीसाठी येतात. या सर्व निविदा १० लाखाच्या आतील आहेत. यावर मा. आयुक्तांनी निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** तेरा ऐतिहासिक दरवाजांचे जतन व संरक्षण करावे लागणार आहे. स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. पाच दरवाजांसाठी ५० लाख रुपये प्रत्येक वर्षी प्रमाणे काम करावयाचे आहे. तेरा पैकी तीन ऐतिहासिक दरवाजे राज्य पुरातत्व खात्याकडे आहेत. सदर दरवाजांचे जतन व संरक्षण करण्याच्या संदर्भात स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. भारतीय पुरातत्व विभागाशी (ए.एस.आय.) संपर्क करण्यात आला. मी अजिंठयाला गेलो होतो त्यावेळी अजिंठा लेण्याचे अधिक्षकांना देखील विचारले. जे भारतीय पुरातत्व विभागासाठी काम करतात त्या ठेकेदारांचे नांव देण्यास सांगण्यात आले. त्यांनी सांगितले की आम्ही स्वतः बांधकाम करतो. फक्त साहित्याचा पुरवठा ठेकेदारांकडून करुन घेतो. आपण जर असे काम केले तर बराच कालावधी लागेल. पुर्वी ज्यांनी या प्रकारचे काम केले ते येतील अशी अपेक्षा वाटत नाही. पुर्वी ज्यांनी काम केलेले आहे, इंटेकला बोलावले, यापैकी दोन लोकांनी साहित्य पुरवठयाची कामे केली असून इतरांनी वास्तू जतन, संरक्षण करण्याची कामे केलेली नाहीत. तडजोड करुन जे योग्य वाटेल ते दर देण्यात यावे. काम करतांना त्यांना सरळसरळ ऐतिहासिक दरवाजांना प्रथम करता येणार नाही. तत्पुर्वी त्यांचेकडून नमुना दाखल लगतच्या ऐतिहासिक भिंतीचे काम करुन घेण्यात येईल व ते काम करुन शकतील असे वाटल्यास त्यांना दरवाजांची कामे देण्यात येतील. इंटेकचे निवृत्त अधिकारी घेता येतील. हे काम दहा लाखाचे आतील असले तरी मा. स्थायी समितीला शब्द दिला म्हणून पाठवले. सदर संचिकेवर आमची सही असल्याने यास आम्ही जबाबदार आहोत.

**मा.सभापती :** ज्या कारणामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर येत आहेत त्या कारणासाठी आवश्यक त्या दुरुस्त्या करुन फेर अंदाजपत्रक करावे. पुन्हा अल्पमुदतीची निविदा प्रसिध्द करुन हे काम करण्यात यावे.

**ठराव :**

शहरातील ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या येत आहेत. ज्या कारणामुळे जास्त दर येत आहेत त्यासाठी सदरील सर्व कामांचे अंदाजपत्रक त्यासह नव्याने तयार करुन सर्व कामांसाठी अल्पमुदतीची निविदा मागविण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **नौबत दरवाजा** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १ भरलेले निविदापत्रक प्राप्त झाले. सदर निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ४५.४६% जास्त दराने |

प्राप्त निविदा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.४६% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे ३० % जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम अशा कामाचा नमुना (Sample) 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ८,३६,९१५/- एवढी असून निविदा ३०% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. १०,८७,९८९/- होणार आहे.

अशा प्रकारचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर यापुर्वी विचारार्थ सादर केला होता.परंतु मा.स्थायी समिती सभा दि. २६-४-२००६ विषय क्र. ७ मध्ये मा.स्थायी समितीने सदर सर्व दरवाजांची एकत्रित अल्प मुदतीची निविदा काढणे बाबत आदेश दिलेले आहेत. परंतु सदर पाच कामे हे वेगवेगळया ठिकाणचे असल्यामुळे ती एकत्रित केल्यास कामास व सर्व कामे एकाच निविदा धारकास दिल्यास कामास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ पुन्हा सादर.

**ठराव :**

शहरातील ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या येत आहेत. ज्या कारणामुळे जास्त दर येत आहेत त्यासाठी सदरील सर्व कामांचे अंदाजपत्रक त्यासह नव्याने तयार करुन सर्व कामांसाठी अल्पमुदतीची निविदा मागविण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **काळा दरवाजा** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.शेख मसुद | १८.१०%जास्त दराने |
| २) | श्री.संतोष मोटेगांवकर | २६.३५%जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री.शेख मसूद यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१०% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे १८.१०% जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम अशा कामाचा नमुना (Sample) 'इंडियन नॅशलन ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ६,६९,०७२/- एवढी असून निविदा १८.१०% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ७,९०,१७४/- होणार आहे.

अशा प्रकारचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर यापुर्वी विचारार्थ सादर केला होता. परंतु मा.स्थायी समिती सभा दि. २६-०४-२००६ विषय क्र. ८ मध्ये मा.स्थायी समितीने सदर सर्व दरवाजांची एकत्रित अल्प मुदतीची निविदा काढणे बाबत आदेश दिलेले आहेत. परंतु सदर पाच कामे हे वेगवेगळया ठिकाणचे असल्यामुळे ती एकत्रित केल्यास कामास व सर्व कामे एकाच निविदा धारकास दिल्यास कामास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ पुन्हा सादर.

**ठराव :**

शहरातील ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या येत आहेत. ज्या कारणामुळे दर जास्त येत आहेत त्यासाठी सदरील सर्व कामांचे अंदाजपत्रक त्यासह नव्याने तयार करुन सर्व कामांसाठी अल्पमुदतीची निविदा मागविण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **पैठणगेट** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | ए.आर.कन्स्ट्रक्शन | २०%जास्त दराने |
| २) | शहा कन्स्ट्रक्शन | २५%जास्त दराने |
| ३) | संतोष मोटेगांवकर | ३५%जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ए.आर.कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन

करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे २०% जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा. स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम अशा कामाचा नमुना (Sample) 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ५,७६,३९५/- एवढी असून निविदा २०% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ६,९१,६७४/- होणार आहे.

अशा प्रकारचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर यापुर्वी विचारार्थ सादर केला होता. परंतु मा.स्थायी समिती सभा दि. २६-०४-२००६ विषय क्र. ९ मध्ये मा.स्थायी समितीने सदर सर्व दरवाजांची एकत्रित अल्प मुदतीची निविदा काढणे बाबत आदेश दिलेले आहेत. परंतु सदर पाच कामे हे वेगवेगळया ठिकाणचे असल्यामुळे ती एकत्रित केल्यास कामास व सर्व कामे एकाच निविदा धारकास दिल्यास कामास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कामाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ पुन्हा सादर.

**ठराव :**

शहरातील ऐतिहासिक दरवाजांची दुरस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या येत आहेत. ज्या कारणामुळे जास्त दर येत आहेत त्यासाठी सदरील सर्व कामांचे अंदाजपत्रक त्यासह नव्याने तयार करुन सर्व कामांसाठी अल्पमुदतीची निविदा मागविण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **रोशन गेट** या ऐतिहासिक दरवाजाची दुरस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | शहा कन्स्ट्रक्शन | ३०.३३%जास्त दराने |
| २) | मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन | ४१.४२%जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाअी अंती सदरील काम हे ३०% जास्त दराने मा.आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम अशा कामाचा नमुना (Sample) 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ६,७८,६०७/- एवढी असून निविदा ३०% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ८,८२,१८९/- होणार आहे.

अशा प्रकारचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर यापुर्वी विचारार्थ सादर केला होता. परंतु मा.स्थायी समिती सभा दि. २६-०४-२००६ विषय क्र. १० मध्ये मा.

स्थायी समितीने सदर सर्व दरवाजांची एकत्रित अल्प मुदतीची निविदा काढणे बाबत आदेश दिलेले आहेत. परंतु सदर पाच कामे हे वेगवेगळया ठिकाणचे असल्यामुळे ती एकत्रित केल्यास कामास व सर्व कामे एकाच निविदा धारकास दिल्यास कामास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीाच्या मंजुरीस्तव व विचारार्थ पुन्हा सादर.

**ठराव :**

शहरातील ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या येत आहेत. ज्या कारणामुळे जास्त दर येत आहेत त्यासाठी सदरील सर्व कामांचे अंदाजपत्रक त्यासह नव्याने तयार करुन सर्व कामांसाठी अल्पमुदतीची निविदा मागविण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र. ९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, मजबुतीकरण तसेच पुन:डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रु. ११,४९,२१०/- चे असुन या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | २१.९९९%कमी दराने |
| २) | के.बी.पाथ्रीकर | १९.२१%कमी दराने |
| ३) | एम.ए.सिद्दीकी | ८.८६%कमी दराने |
| ४) | रे कन्स्ट्रक्शन | ४ %कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९९९%कमी दराची आहे. तरी मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण मजबुतीकरण तसेच पुन:डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९९९%कमी दराची मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०६/प्र.क्र.५/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि. ९ मे २००६ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि. १ मे २००६ महागाई भत्ता वाढ ३ % मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि. १-५-२००६ पासून महागाई भत्ता २१% ऐवजी २४% अदा करण्यासाठी प्रती माह रु. ७.८३ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना मे २००६ च्या मासिक वेतनापासून

नियमित पगारात २१ % ऐवजी २४% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरते.

**ऐनवेळचे विषय**

मा. सभापती : ऐनवेळचे काही विषय आहेत, त्यांस मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२६ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. सभापती स्थायी समिती यांच्या दालनाचे आधुनिकीकरण करणेस्तव तसेच जुने झालेले पार्टीशन बदलणे व त्या अनुषंगाने इतर किरकोळ कामे करणेस्तव सा. बां. विभागाच्या सन २००४-२००५ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १,४७,३१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. हे काम तातडीने करून घेण्यासाठी मा. स्थायी समिती सभापती यांनी सुचित केले होते.

सदरील कामाची तातडी पाहता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)२ नुसार काम करून घेणेस्तव मा. सभापती, स्थायी समिती यांनी सूचना केल्यानुसार उपलब्ध ठेकेदार मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आले आले आहे. सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. ०६-०५-२००६ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात 'प्रशासकीय इमारत' या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,४७,३१५/- तसेच प्रस्तावित काम उपलब्ध ठेकेदार मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)२ नुसार करून घेण्याच्या कार्योत्तर प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. सभापती स्थायी समिती यांच्या दालनाचे आधुनिकीकरण करणेस्तव तसेच जुने झालेले पार्टीशन बदलणे व त्या अनुषंगाने इतर किरकोळ कामे करणेस्तव तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४७,३१५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम उपलब्ध ठेकेदार मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील खेळणी २० वर्षापूर्वी बसविण्यात आली होती. वेळोवेळी दुरुस्ती करून आतापर्यंत उपयोगात आणण्यात आली. आता त्या जागेवर नवीन खेळणी बसविण्याकरिता

रक्कम रुपये १५,०००,०००/- (पंधरा लक्ष रुपये) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. करिता अंदाजपत्रक मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानात नवीन खेळणी बसविण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १५,००,०००/- (पंधरा लक्ष रुपये) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी ६ ते ८ फुट उंचीचे १०,००० झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

याकरिता खड्डे खोदणे, माती टाकणे व झाडे खरेदी करणे इत्यादी कामाकरिता रुपये ५.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर काम तातडीचे असल्याने उपलब्ध ठेकेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने तसेच शहर अभियंता, उप अभियंता (स्लम), उद्यान अधिक्षक यांनी प्रत्यक्ष रोपवाटीकेत जाऊन झाडांचे दर निश्चित करून आवश्यक ती झाडे खरेदी करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी ६ ते ८ फुट उंचीचे १०,००० झाडे लावण्यासाठी खड्डे खोदणे, माती टाकणे व झाडे खरेदी करणे इत्यादी कामाकरिता लागणाऱ्या र. रु. ५.०० लक्ष च्या खर्चास तसेच काम तातडीचे असल्याने उपलब्ध ठेकेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास आणि शहर अभियंता, उप अभियंता (स्लम), उद्यान अधिक्षक यांनी प्रत्यक्ष रोपवाटीकेत जाऊन झाडांचे दर निश्चित करून आवश्यक ती झाडे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र. ९४ बन्सीलालनगर अंतर्गत मगरबी कॉलनी, जहागीरदार कॉलनी, जालाननगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रु. १९,९९,७२२/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ५ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. आदीनाथ कन्सट्रक्शन | २२% कमी दराने |
| २ | ए. एस. कन्सस्ट्रक्शन | १८.८९% कमी दराने |
| ३ | एम. ए. सिद्यीकी | १०.८६% कमी दराने |
| ४ | चारणीया कन्स्ट्रक्शन | ९.९% कमी दराने |
| ५ | रे कन्स्ट्रक्शन | ३% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची आहे. तरी मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९४ बन्सीलालनगर अंतर्गत मगरबी कॉलनी, जहागीरदार कॉलनी, जालाननगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २२% कमी दराची मे. आदीनार्थ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गौतमनगर ते पिसादेवी रस्त्याचे (महानगरपालिका हद्दिपर्यंत) पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामाच्या रु. २२.५० लक्षच्या अंदाजपत्रकास दि. १९.१२.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत मंजुरी मिळालेली आहे. तसेच दि. १.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये विषय क्र. २५६ नुसार मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे.

उपरोक्त कामात १.६० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे नियोजित आहे. गौतमनगरपासून महानगपालिकेची हद्द ३ कि.मी. लांबीच्या अंतरापर्यंत आहे. उर्वरित १.४० कि. मी. लांबीच्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे व या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वाढीव रक्कम रु. ११.५० लक्ष (एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३३.३९ लक्ष) ला दि. २४.०५.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळालेली आहे. सध्या डांबराच्या दरात प्रचलित दरापेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली असल्याने मे. मॉस्कोट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने उर्वरित काम करून घेतल्यास महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तरी उर्वरित काम (अंदाजपत्रक रु. ११.५० लक्ष) कामाचे मुळ कंत्राटदार मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याकरिता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर ते पिसादेवी रस्त्याचे (महानगरपालिका हद्दिपर्यंत) पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामाअंतर्गत उर्वरित १.४० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. ११.५० लक्षचे काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद